दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

बुलडाणा, रविवार, दि.०६ ऑक्टोबर २०२४

वर्ष : ०४, अंक : ५३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## आजचा रंग नारिंगी



नवरात्रातील दुर्गा मातेच्या चौथ्या रूपाचे नाव कुष्मांडा देवी असे आहे. जेव्हा सृष्टीचे अस्तित्व नव्हते व चारही दिशेला केवळ अंधार पसरलेला होता तेव्हा, याच देवीने आपले स्मित हास्य करून ब्रम्हांडाची रचना केली. त्यामुळेच तिचे नाव कुष्मांडा देवी असे पडले. आणि म्हणूनच ती सृष्टीची आद्यशक्ती देखील आहे. तिला आठ पूजा आहेत म्हणून तिला अष्टभुजा असे देखील संबोधतात. तिच्या सात भुजांमध्ये कमांडलू धनुष्य, बाण, कमळ,अमृत कलश, चक्र व गदा आहे, व आठव्या हातात जपमाळ असून ती सिहारुढ आहे. कुष्मान्डा देवीचे निवासस्थान हे सूर्य मंडलात आहे. तिच्या तेजाने दाही दिशा उजळून निघतात तसेच ब्रह्मांडातील प्रत्येक गोष्टीचे व प्राणीमात्रांमधील तेज हे तिच्या कृपेनेच आहे. तिच्या उपासनेने भक्तांचा कोणताही आजार बरा होतो व त्यांचे आयुष्य, यश, शक्ती व आरोग्य यात वृद्धी होते. व कुष्मान्डा देवी आपल्या भक्ताला सुख, समृद्धी व प्रगतीकडे घेऊन जाते.

## महाराष्ट्र सर्व क्षेत्रांमध्ये अग्रेसर

### - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.५, ठाणे :** सिंचनापासून ते पायाभूत सुविधापर्यंत, उद्योगापासून ते महिला सक्षमीकरणापर्यंत, तरुणापासून ते ज्येष्ठांपर्यंत, परदेशी गुंतवणूकीपासून ते झोपडपट्टी पुनर्विकासापर्यंत अशा सर्व क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रेसर असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजानिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, महिला व बालविकास मंत्री कु.अदिती तटकरे, खासदार डॉ.शीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, खासदार सुरेश म्हात्रे, सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाठ, विधानपरिषद सदस्य आमदार चंद्रशेखर बावनकुळे, निरंजन डावखरे, विधानसभा सदस्य सर्वश्री आमदार गणेश नाईक, संजय केळकर, प्रताप सरनाईक, किसन कथोरे, कुमार आयलानी, विश्वनाथ भोईर, तसेच आमदार श्रीमती मंदा म्हात्रे, गीता जैन आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागीय आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, ठाणे जिल्ह्यातील विविध महानगरपालिकांचे आयुक्त, वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हा



प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे पुढे म्हणाले की, अमृताहूनही गोड असलेल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानत ते म्हणाले, आजचा दिवस सुवर्ण अक्षरात लिहून ठेवण्यासारखा आहे. प्रधानमंत्री श्री.मोदी हे विश्वास, गती आणि प्रगती या तत्त्वावर विश्वास ठेवतात, त्यामुळे आज विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात येत आहे. मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यासाठी आजचा दिवस फार महत्त्वाचा असून आजच्या दिवशी इंटरनल मेट्रो २९ कि.मी. ची सेवा सुरु होणार आहे. ठाण्याची वाहतूक कोंडी दूर होणार आहे. ठाणे महापालिकेच्या इमारतीची पायाभरणी होत आहे. सध्याच्या फ्री वे ला छेडानगर ते ठाण्यापर्यंत वाढविण्यात येणार आहे. ठाणे ते मुंबई प्रवास वेगवान होणार आहे. नवी मुंबई विमानतळ उड्डाणासाठी सज्ज झाले आहे. सिडकोच्या नैना प्रकल्पात देखील मोठी पायाभूत सुरु आहे. सिडकोची ही टाऊनशिप मुंबईची शान वाढविणारी ठरणार आहे. प्रधानमंत्री यांच्या हस्ते ज्या विकास प्रकल्पाचे भूमिपूजन होते, ते सर्व प्रकल्प पूर्ण होतात. आज ज्या प्रकल्पांचा शुभारंभ होत आहे, त्या सर्व प्रकल्पांचे लोकार्पण देखील प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

मेट्रो ३ चा पहिला टप्पा तसेच इतर विकास प्रकल्प यापूर्वी थांबविण्यात आले होते. त्या सर्व प्रकल्पांना या सरकारने चालना दिलेली आहे. मेट्रो ३ चा बीकेसी ते कुलाबा हा दुसरा टप्पा लवकरच सुरु होणार असून अटल सेतू, कोस्टल रोड असे मोठमोठे प्रकल्प वेळेत पूर्ण होत आहेत. आज शुभारंभ झालेल्या मेट्रो ३ च्या माध्यमातून २० लाख ठाणे व मुंबईकर प्रवास करणार आहेत असे सांगून या प्रकल्पाला अर्थसहाय्य दिलेल्या जपानच्या जायकाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आभार मानले.

## माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये शरद पवारांच्या रा.का.मध्ये




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.५, उमरेड (नागपूर) :** माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटमध्ये प्रवेश घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. गजभिये हे काँग्रेसकडून २०१९ निवडणूक लढले होते. यात त्यांचा पराभव झाला व त्यानंतर नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने तिकीट नाकारल्याने वंचित बहुजन आघाडी कडून ते निवडणूक लढले, यावेळी त्यांचा पराभव झाला होता.

उल्लेखनीय बाब म्हणजे, उमरेड विधानसभा अनुसूचित जाती करता राखीव असून राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने उमरेड विधानसभा वर दावा केला आहे. मात्र राष्ट्रवादीकडे उमरेड विधानसभेत तगडा उमेदवार नव्हता. त्यामुळेच राज्याचे माझी गृहमंत्री अनिल देशमुख, यांनी किशोर गजभिये यांना राष्ट्रवादीत आणून उमरेड विधानसभा राष्ट्रवादी लढण्याचे संकेत दिसून येत आहेत. गजभिये यांचा पक्षप्रवेश नुकताच मुंबई येथील वाय बी चव्हाण सेंटर मध्ये पार पडला. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, रमेशचंद्र बंग, नागपूर जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष राजूभाऊ राऊत यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## आजचा दिवस महाराष्ट्राच्या उज्वल भविष्याचे स्वप्न पूर्ण करणारा -पंतप्रधान नरेंद्र मोदी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.५, ठाणे :** आज महायुती सरकारने मुंबई-एमएमआरमध्ये ३३ हजार कोटींहून अधिकचे प्रकल्प सुरू केले आहेत. आज १२ हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रोची पायाभरणीही झाली आहे. नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्र, नैना प्रकल्प, छेडानगर ते आनंदनगर असा उन्नत ईस्टर्न फ्री-वे, ठाणे महापालिकेचे नवीन मुख्यालय, अशा अनेक मोठ्या विकासकामांची पायाभरणीही आज करण्यात आली. या विकासकामांमुळे मुंबई आणि ठाण्याची आधुनिक ओळख होणार आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

पंतप्रधान श्री.मोदी यांच्या हस्ते दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी वालावलकर सभा मैदान, बोरीवडे गाव, कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे (प.) येथे ३३ हजार कोटी रुपयांच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांचे ऑनलाईन भूमीपूजन व उद्घाटन तसेच मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेच्या महिला लाभार्थ्यांचा प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार सोहळा संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमात महाराष्ट्रातील पहिली भूमिगत मेट्रो - कुलाबा-वांद्रे-सीप्झ : मुंबई मेट्रो मार्गिका - ३ टप्पा-१ (आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स स्थानक) शुभारंभ, ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे भूमीपूजन, पूर्व मुक्त मार्ग विस्तार छेडा नगर, घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे प्रकल्पाचे भूमीपूजन, नैना नगर रचना परियोजनांतर्गत विविध पायाभूत सुविधा कामांचे भूमीपूजन, ठाणे महानगरपालिकेच्या नूतन इमारतीचे भूमीपूजन,



मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा प्रातिनिधीक सत्कार, असे विविध कार्यक्रम संपन्न झाले.

यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजानिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, महिला व बालविकास मंत्री कु.अदिती तटकरे, खासदार डॉ.शीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, खासदार सुरेश म्हात्रे, सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाठ, विधानपरिषद सदस्य आमदार निरंजन डावखरे, विधानसभा सदस्य सर्वश्री आमदार गणेश नाईक, संजय केळकर, प्रताप सरनाईक, किसन कथोरे, डॉ.बालाजी किणीकर, शांताराम मोरे, महेश चौघुले, कुमार आयलानी, विश्वनाथ भोईर, तसेच आमदार श्रीमती मंदा म्हात्रे, गीता जैन आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागीय आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, ठाणे जिल्ह्यातील विविध महानगरपालिकांचे आयुक्त, वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान श्री.मोदी पुढे म्हणाले की, आज एक मोठी आनंदाची बातमी घेवून महाराष्ट्रात आलो आहे. केंद्र सरकारने आपल्या मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. ज्या परंपरेने देशाला ज्ञान, तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि साहित्याची समृद्ध संस्कृती दिली आहे त्याचा हा सन्मान आहे. त्याबद्दल मी देशातील आणि जगातील सर्व मराठी भाषिकांचे अभिनंदन करतो.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेबद्दल बोलताना त्यांनी या योजनेच्या माध्यमातून सर्व महिलांना महिना दीड हजार रुपये देण्यात येत आहेत, ही योजना महाराष्ट्रात अत्यंत यशस्वी होत आहे, याबद्दल समाधान व्यक्त करून ते म्हणाले, नवरात्रीच्या काळात एकापाठोपाठ एक अनेक विकास कामांची उद्घाटने आणि पायाभरणी करण्याचे सौभाग्य मला मिळत आहे. ठाण्याला पोहोचण्यापूर्वी मी वाशिमला होतो. तेथे मला देशातील ९.५ कोटी शेतकऱ्यांना किसान सन्मान निधी जाहीर करण्याची आणि अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन करण्याची संधी मिळाली. आता महाराष्ट्राच्या आधुनिक विकासाचे अनेक मोठे विक्रम ठाण्यात निर्माण होत आहेत. मुंबई-एमएमआर आणि महाराष्ट्राच्या विकासाचा हा सुपरफास्ट वेग आज महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची झलक देत आहे. आजच आरे ते बीकेसी, मुंबई या ॲक्वा लाइन मेट्रोचेही उद्घाटन होत आहे. अनेक दिवसांपासून मुंबईतील लोक या लाईनची वाट पाहत होते. आज मला जपान सरकारचेही आभार व्यक्त करायचे आहेत. या प्रकल्पासाठी जपानने जपानी आंतरराष्ट्रीय सहकार्य एजन्सीमार्फत भरपूर सहकार्य केले आहे. त्यामुळे एक प्रकारे ही मेट्रो भारत-जपान मैत्रीचेही प्रतीक आहे.

आज प्रत्येक देशवासीयाचे एकच ध्येय आहे - विकसित भारत! त्यामुळे आपल्या सरकारचा प्रत्येक निर्णय, प्रत्येक संकल्प, प्रत्येक स्वप्न विकसित भारताला समर्पित आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी मुंबई-ठाण्यासारखी शहरे भविष्यात सज्ज करायची आहेत.

ते म्हणाले की, आज मुंबई महानगरात सुमारे ३०० किलोमीटरचे मेट्रोचे जाळे तयार होत आहे. आज मरीन ड्राइव्ह ते वांद्रे हा प्रवास कोस्टल रोडने १२ मिनिटांत पूर्ण होत आहे. अटल सेतूने दक्षिण मुंबई ते नवी मुंबई हे अंतरही कमी केले आहे. ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह भूमिगत बोगद्याच्या प्रकल्पाला गती मिळाली आहे. असे अनेक प्रकल्प आहेत. वर्सोवा ते वांद्रे सागरी सेतू प्रकल्प, ईस्टर्न फ्रीवे, ठाणे-बोरिवली बोगदा, ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प अशा प्रकल्पांमुळे या शहरांचा चेहरामोहरा बदलत आहे. मुंबईकरांना याचा मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे मुंबई आणि आसपासच्या शहरातील समस्या कमी होतील. येथे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, येथे उद्योगधंदे वाढतील.

महामार्ग, द्रुतगती मार्ग, रस्ते आणि विमानतळांच्या विकासातही आम्ही विक्रम केला आहे आणि २५ कोटी गरीब लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे, असे सांगून आता देशाला खूप पुढे न्यायचे आहे. सर्व मिळून महाराष्ट्राची स्वप्ने पूर्ण करू, या शब्दात सर्व विकास प्रकल्प आणि विकासकामांच्या पूर्णत्वासाठी उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## बोपदेव घाटात कोयत्याच्या धाकाने तरुणीवर सामुहिक बलात्कार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.५, पुणे :** बोपदेव घाटात महाविद्यालयीन तरुणीवर कोयत्याच्या धाकाने सामुहिक बलात्कार करण्यात आल्याची माहिती तपासात मिळाली आहे. पीडित तरुणी आणि तिच्या मित्राला आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. बलात्कारापूर्वी आरोपींनी तरुणी आणि तिच्या मित्राकडील चीजवस्तूंची लूट केल्याचे तपाासात उघडकीस आले आहे.


कोंढव्यातील टेबल पॉईंट परिसरात गुरुवारी रात्री तरुणी आणि तिचा मित्र फिरायला गेले होते. त्यावेळी आरोपी तेथे आले. त्यांनी तरुणी आणि तिच्या मित्राला कोयत्याचा धाक दाखविला. मित्राला मारहाण करुन त्याचा शर्ट काढला. शर्टनने हातपाय बांधले. पॅन्टचा पट्टा काढून त्याचे पाय बांधले. तरुणाला एका झाडाला बांधून आरोपींनी तरुणीवर सामुहिक बलात्कार केला. आरोपींकडे कोयता, चाकू अशी शस्त्रे होती, तसेच एका आरोपीच्या हातात बांबू होता, अशी माहिती तपासात मिळाली आहे. मित्राला ठार मारण्याची धमकी देऊन आरोपींनी तरुणीवर सामुहिक बलात्कार केला.

आरोपी तेथून निघून गेल्यानंतर तरुणीने स्वत:ला सावरले. तिने झाडाला बांधलेल्या मित्राची सुटका केली. तेथून दोघे जण वारजे भागात गेले. पीडित तरुणीने तिच्यावर गुदरलेल्या प्रसंगाची माहिती बहिणीला दिली. त्यानंतर तरुणी आणि तिचा मित्र एरंडवणे भागातील एका खासगी रुग्णलायात गेले. प्राथमिक उपचारानंतर तरुणीला ससून रुग्णलयात दाखल करण्यात आले. त्यानंतर शुक्रवारी पहाटे पोलिसांना रुग्णालय प्रशासनाने याबाबतची माहिती (एमएलसी- मेडिको लिगल केस) पोलिसांना कळविली.

**आरोपींच्या मागावर २५ पथके !**

संशयित आरोपी सीसीटीव्ही चित्रीकरणात आढळून आले आहे. तरुणीने दिलेल्या माहितीनुसार आरोपींचे रेखाचित्र जारी करण्यात आले आहे. आरोपींविषयी काही माहिती असल्यास त्वरीत पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. आरोपींना पकडण्यासाटी पोलिसांनी २५ पथके तयार केली आहेत. ग्रामीण पोलिसांकडून पोलिसांना तपासात सहाय केले जात आहे. बोपदेव घाट निर्जन आहे. या भागात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, तसेच तांत्रिक अडचणींमुळे मोबाइल विश्लेषण करण्यात येत अडथळे आले आहे. आरोपी बोपदेव घाटातून सासवडकडे गेले आहेत. सासवडकडे जात असताना संशयित आरोपींचे सीसीटीव्ही चित्रीकरण पोलिसांना उपलब्ध झाले आहे.

## नंदुरबार जिल्ह्यास पुन्हा भूकंपाचे धक्के




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.५, नंदुरबार :** नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात खोकसा गाव परिसरात शुक्रवारी रात्री पुन्हा भूकंपाचे सौम्य हादरे बसले. गुजरातमधील गांधीनगरच्या भूकंपमापन यंत्रात २.२ रिश्टर स्केल इतकी तीव्रता नोंदवली गेली. वारंवार बसणाऱ्या हादऱ्यांमुळे परिसरातील ग्रामस्थ पुरते घाबरले आहेत. ग्रामस्थ रात्र रस्त्यावरच जागून काढत असल्याचे चित्र आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील खोकसा, दापूर परिसरात शुक्रवारी रात्री भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. खोकसा गाव परिसरातील जंगलांमधून येत असलेला आवाज, जमिनीत निर्माण होत असलेले कंपन याची मालिका थांबण्याचे नाव घेत नसल्याने ग्रामस्थ पुरते हादरले आहेत. भूजल विभागाच्या अधिकाऱ्यांनी या परिसराची पाहणीदेखील केली आहे. तीन ते चार दिवसांपासून या भागात भूकंपाचे धक्के जाणवत असतांना जिल्हा प्रशासकीय यंत्रणेकडून कोणतीही ठोस तपासणी करण्यात येत नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. मुळातच या भागात अनेक दिवसांपासून होणाऱ्या आवाजांबाबत ग्रामस्थांनी तक्रारी केल्या असतानाही यंत्रणेला ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून कार्यवाही करावेसे वाटलेले नाही. लोकप्रतिनिधींच्या पातळीवरही उदासीनता दिसत आहे.

## पत्नीचा खून करून पतीचा आत्महत्येचा प्रयत्न, पत्नीच्या चारित्र्यावर संशय !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.५, पारनेर (अ.नगर) :** ६५ वर्षीय पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने डोक्यात कुऱ्हाडीचे वार करत खून केल्याची घटना घटस्थापनेच्या दिवशी गुरुवारी (दि.३ ऑक्टोबर) सकाळी घडली. ताराबाई राजाराम थोरात (वय ६५, रा. बोरवाक मळा, ढवळपुरी, ता.पारनेर) असे मयत महिलेचे नाव असून राजाराम रेवजी थोरात (वय ७०) असे आरोपीचे नाव आहे. पत्नीचा खुन केल्यानंतर पतीनेही गळफास घेउन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो असफल झाला. ढवळपुरी शिवारातील वनकुटे स्त्यावरील बोरवाक मळा परिसरात थोरात कटूंब वास्तव्यास आहे. गुरूवारी सकाळी राजाराम व त्याची पत्नी ताराबाई यांच्यात वाद झाले. राजाराम याचा डोक्यात संशयाचे भूत फिरत होते. त्याच रागातून राजाराम याने पत्नी ताराबाई हीस चटके दिले. त्यानंतर शेजारच्या कपाशीच्या शेतामध्ये नेऊन कुऱ्हाडीने डोक्यावर सपासप वार केले. त्यात पत्नी ताराबाई हिचा जागीच मृत्यू झाला. त्यावेळी राजारामचा मुलगा संजय हा शेतामध्ये काम करण्यासाठी गेला होता तर सुन आशा जनावरे चारण्यासाठी गेल्या होत्या. त्या घरी आल्या असता घरामध्ये भाकरी अस्ताव्यस्त पडलेल्या आढळून आल्याने त्यांना संशय आला. त्यांनी सासरा राजाराम याच्याकडे आत्या कुठे गेल्या याची विचारणा केली असता राजाराम याने हाताने विहीरीकडे बोट दाखविले. सासू- सासऱ्यांमध्ये भांडण होऊन सासऱ्याने सासूला विहीरीत ढकलून दिल्याचा संशय सुन आशा यांना आला. त्यांनी विहीर परीसरात पाहणी केली असता त्यांना तिथे काही आढळून आले नाही. सुन आशा या सासून सापडल्याने परत घरी आल्या. त्यावेळी घरामध्ये राजाराम याने फाशी घेण्याचा प्रयत्न केला होता. आशा आल्या त्यावेळी दोरी तुटल्याने गळ्याला दोरी बांधलेल्या अवस्थेत राजाराम जमीनीवर पडलेला होता. आशा यांनी आजूबाजूच्या लोकांना बोलावून राजाराम यास रुग्णालयात दाखल केले. सायंकाळी राजाराम शुध्दीवर आला. राजाराम यास रुग्णालयात दाखल केल्यानंतर आशा व त्यांच्या मुलाने सासूचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असताना घराजवळच्या कपाशीच्या शेतामध्ये ताराबाई यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळून आला. मृतदेहाजवळ गुन्ह्यात वापरण्यात आलेली कुऱ्हाडही आढळून आली. घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला. आशा संजय थोरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राजाराम रेवजी थोरात वय ७० यांच्याविरोधात पारनेर पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# संपादकीय



## ‘विकसित भारता’चे स्वप्न आणि ‘व्यवस्थे’चे वास्तव

सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातल्या प्रश्नांची उदाहरणे : ‘माझी बस का उशिरा येते?’ हा एसटीने प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनीला पडणारा प्रश्न. ‘माझ्या विहिरीतील पाणी लवकर का आटते?’ हा मराठवाडयातील छोटया शेतकऱ्याचा प्रश्न. ‘मी बनवलेल्या फर्निचरला मागणी का नाही?’ हा शहरातील सुतारकाम–उद्योजकाला पडणारा प्रश्न. त्याचप्रमाणे ‘बारावीच्या मार्कावर माझ्या मुलीला डॉक्टर का होता येत नाही?’ हे सर्व भारतातील बहुतांश लोकांच्या रोजच्या जीवनातले प्रश्न आहेत. यांना आपण ‘मूलभूत भौतिक प्रश्न’ असे म्हणूया.

आपली राजकीय व प्रशासकीय परिस्थिती बघितली तर घटनेप्रमाणे, केंद्रीय व्यवस्थेला सर्वोच्च स्थान आणि राज्यव्यवस्थेला दुय्यम स्थान आहे. केंद्रीय व्यवस्थेत केंद्र शासनाकडे, आणि त्यातही विशेषत: पंतप्रधान पदाकडे सत्तेचे आत्यंतिक केंद्रीकरण झालेले आहे. केंद्र शासनाचे विभाग व उपक्रम, ‘आयएएस’प्रणीत प्रशासन व्यवस्था, आयआयटी आदी उच्चशिक्षण संस्था, भारतीय हवामान विभाग अशा वैज्ञानिक संस्था मिळून ही राष्ट्रीय व्यवस्था चालवतात. दुष्काळ जाहीर करण्यापासून खाद्यपदार्थाची चाचणी याचे तांत्रिक निकष व सर्वेक्षण पद्धती या संस्था ठरवतात. स्थानिक पातळीवर उपयोगी पडणारे ज्ञान निर्माण करण्याचे राज्यांचे अधिकार खूपच मर्यादित आहेत आणि ज्ञाननिर्मितीची क्षमताही कमी आहे.

अशा केंद्रीकृत व्यवस्थेत कार्यकारी अधिकार हे वरच्या पातळीवर एकवटतात. वैद्यकीय पदवीच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवरची एकच परीक्षा, हे अशा अधिकारांच्या केंद्रीकरणाचेच उदाहरण. या केंद्रीय प्रशासन व्यवस्थेचे लोकसभा व राज्यसभा यांना उत्तरदायित्व अत्यंत कमी आहे. राहिलेच, तर ते सर्वोच्च न्यायालय आणि काही प्रमाणात प्रसारमाध्यमांशी आहे. अनेक क्षेत्रांत वस्तुनिष्ठ माहितीचा अभाव दिसतो तो यामुळे. राज्यांच्या सार्वजनिक बस सेवेचा तुलनात्मक अभ्यास, रेल्वे अपघातांचे विश्लेषण अथवा कोविड–बळींची अधिकृत टक्केवारी यात राज्याराज्यांमधील मोठी तफावत याची कारणमीमांसा – असे अभ्यास क्वचितच मांडले जातात. त्यामुळे, आपल्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी ज्ञाननिर्मिती क्वचितच होते.

राज्य पातळीवरही असेच केंद्रीकरण दिसते. सर्व सत्ता ही मुख्यमंत्री अथवा वरिष्ठ मंत्रीपदांकडे एकवटलेली दिसते. विधिमंडळाशी राज्य शासनाचे उत्तरदायित्व हे पूर्णपणे राज्याची राजकीय संस्कृती, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वतंत्र माध्यमांचे अस्तित्व यावर अवलंबून असल्याचा आजचा काळ. अशा वेळी, लोक–चळवळी आणि लोकांनी चालवलेली स्थानिक प्रसारमाध्यमे हीच स्थानिक प्रश्नांकडे लक्ष वेधणारी साधने ठरतात. या गोष्टी राज्यपरत्वे बदलतात. कोविड–बळींच्या अधिकृत टक्केवारीतील फरकामागे हे प्रमुख कारण आहे. उत्तर प्रदेशात जे चालून जाते ते गोव्यात वा कर्नाटकात चालत नाही! अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास, आपली एक राष्ट्रीय अर्थव्यवस्था आहे आणि तिला जोडलेल्या अनेक छोटया–मोठया प्रादेशिक अर्थव्यवस्था आहेत.

आज प्रादेशिक अर्थव्यवस्थांचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर अवलंबित्व मोठया प्रमाणात वाढताना दिसते. देशाची संपत्ती ही शंभरेक बडया व्यापारी–उद्योजक घराण्यांच्या हातात एकवटली आहे. छोटया उद्योजकांचे त्यांच्या प्रादेशिक बाजारपेठेतही स्थान कमी होऊन, बडया कंपन्याच विस्तारत आहेत. देशातल्या फक्त २० टक्के लोकांकडे ८० टक्के संपत्ती एकवटली आहे. उरलेली ८० टक्के लोकसंख्या ही असंघटित क्षेत्रात काम करीत आहे आणि त्यातले बहुतांश लोक तुटपुंज्या पगारावर वरच्या २० टक्के बडया लोकांची सेवा करीत आहेत. लोकांकडून परिस्थितीचे योग्य आकलन होणे, प्रश्नांच्या अभ्यासाची मागणी होणे व प्रशासनाकडून समस्यांची विश्लेषणात्मक मांडणी होणे ही कुठल्याही सशक्त लोकशाहीसाठी आवश्यक गोष्ट असते. या माहितीचे रूपांतर लोकचळवळीपासून मतपेटीपर्यंत होत असते. आपली परिस्थिती याउलट आहे. निवडणुकांचा हंगाम जवळ आला आहे. त्यात शिवाजी महाराजांच्या तलवारीपासून मशिदींचे अवैध बांधकाम, सावरकरांबद्दल राहुल गांधींची वक्तव्ये, पॅकेजच्या घोषणा– यांसारखे विषय प्रसारमाध्यमे आपल्यासमोर ठेवत आहेत. लोकही दर्जेदार सार्वजनिक सेवा मिळण्यासाठी आग्रही राहण्याऐवजी शासनाकडून मिळणाऱ्या ‘लाडक्या’ सवलती घेण्यात मग्न आहेत!

# मराठीचे संवर्धन करणे आपलीच जबाबदारी !

**जगभरातील मराठी जनांना गेल्या अनेक दशकांपासून ज्याची प्रतीक्षा होती तो दिवस अखेर उजाडला. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी जे निकष असतात ते पूर्ण झाल्याने हा दर्जा मराठी भाषेला मिळाला आहे.**

अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे ३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. ते आता मराठी भाषा संवर्धनासाठी मिळणार आहे. भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ आणि साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यासह इतर प्रकल्पांसाठी सरकारकडून आर्थिक पाठबळ दिले जाईल. अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात आता मराठी विद्वांनांनाही हे पुरस्कार मिळतील. मराठीसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिजची स्थापना केली जाईल. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये आता मराठी भाषा शिकण्याची व्यवस्था केली जाईल. मराठीतील प्राचीन ग्रंथांचा अनुवाद केला जाईल. असे बरेच लाभ मराठी भाषेला आता अधिकृतरीत्या मिळतील. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो.

या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो, येणार मराठी राजभाषा दिवस अधिक उत्साहाने साजरा होईल यात शंका नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा तर मिळाला; मात्र तिचे संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारी आपलीच आहे याचा विसर आपल्याला पडता कामा नये. आजमितीला मराठी भाषेची स्थिती पाहिल्यास दहापैकी ३ जणांना तरी शुद्ध



मराठीत दहा ओळी म्हणता येतील का हा प्रश्न आहे.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात त्यातही राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वर्षागणिक वाढू लागले आहे, पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.

आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का ? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना मग समोरचा कोणत्याही भाषेचा का असेना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी–डॅडी' ऐवजी आई–बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग–गुड नाईट' ऐवजी सुप्रभात–शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे–महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.

केवळ अभिजात दर्जा मिळालेला म्हणून मराठीला लागलेली अवकळा थांबणार नाही.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## चवथी माळ..

अष्टभुजा सिंहारूढा
चवथे रुप कुष्मांडा
महा देवी स्नेहदायी
तुच निर्मीले ब्रम्हांडा

दंडी माता अहम्गंडा
तारकासुरा बलदंडा
नजरआईची करारी
भस्मकरते आडदंडा

तुजला प्रिय कोहळा
चालवशी गं त्रिखंडा
स्मित हास्य रे दास्य
मनगटी बांधी गंडा

रक्तवर्णी वस्त्र शोभे
तेजदेशी अग्नीकुंडा
तुचि रक्षी सौभाग्या
कुंकवाचा गं करंडा

वाहे तव पीत पुष्पें
उंच नाचे भक्तीझंडा
अवघ्या विश्वावरती
कृपा करी गे चामुंडा

श्री सूक्त शक्ती पाठ
भक्तीरस पायीसांडा
सहकुटुंब लीन होता
संसारास सुखे मांडा

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अभिजात मराठी...



संपूर्ण महाराष्ट्राला व जगभरात पसरलेल्या मराठी जणांना अभिमान वाटावा अशी बातमी घटस्थापनेच्या दिवशी आली आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांचा ऊर अभिमानाने भरून आला. ती बातमी होती मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हे महाराष्ट्रातील तेरा कोटी जनतेचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार होण्यासाठी कैक दशकांची वाट पाहावी लागली मात्र उशिरा का होईना हे स्वप्न साकार झाले यासाठी केंद्र सरकारचे मनापासून आभार मानावे लागेल त्यासोबतच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संघर्ष करणाऱ्या हजारो ज्ञात – अज्ञात व्यक्तींनाही सलाम करावा लागेल. केंद्र सरकारने मराठीसह पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना देखील अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. याआधी संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड, उडिया, मल्ल्याळम या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीच्या श्रेष्ठत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. अर्थात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा प्रवास सोपा नव्हता. एक हजार वर्ष जुनी व पाच हजार बोलीभाषेपासून तयार झालेली अमृतातही पैज जिंकणारी मराठी भाषा अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळत नव्हता. मराठी भाषा ही मराठी संस्कृतीचा अस्सल आधार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासकीय पातळीवर अनेकदा प्रयत्न झाले आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली होती, त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे सोपवून नऊ वर्ष झाली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारी २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली होती. मराठी भाषेचे संशोधन करून व सूक्ष्म अभ्यास करून पुरावे गोळा करण्याचे काम या समितीकडे सोपवण्यात आले होते. प्रा रंगनाथ पठारे यांच्यासमवेत प्रा हरी नरके आणि व अन्य काही सदस्य या समितीत होते. या समितीने अतिशय सूक्ष्म अभ्यास करून मराठी भाषा अभिजात भाषेसाठी कशी पात्र आहे याचे सर्व पुरावे गोळा करून शासनाकडे सोपवले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास विरोध करणारी याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळली, तरीही मराठी भाषा अभिजात दर्जापासून वंचित होती. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मराठा भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राकडून जास्तीचा निधी मिळेल त्यामुळे मराठी भाषेची उंची आणखी वाढेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेची प्रतिष्ठा आणखी वाढेल. आता मराठी भाषेच्या श्रेष्ठत्वावर राज्यमान्यतेची मोहर उमटली आहे. मुख्य म्हणजे आता मराठी भाषेच्या विकास कार्याला अधिक चालना मिळणार आहे. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडून अधिकचा निधी मिळणार आहे त्यामुळे प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे सुलभ होणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने दरवर्षी मराठी भाषेतील दोन विद्वानांना राष्ट्रीय पुरस्कार मिळतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे याचा महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांना अभिमान आहे. म्हणूनच अभिमानाने म्हणावेसे वाटते

**लाभले भाग्य आम्हास...**
**बोलतो मराठी....**

**–श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शूटिंग बॉल स्पर्धेत लिटिल फ्लॉवर इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थाचे यश



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.५, मुंबई :** घाटकोपरच्या लिटिल फ्लॉवर इंग्लिश हायस्कूलच्या १९ वर्षाखालील मुला मुलींच्या संघाने द्वितीय पारितोषिक मिळवण्यात यश आले आहे. विक्रोळीच्या कन्नमवार नगर संभाजी मैदान येथे जिल्हा स्तरीय २०२४-२५ शूटिंग बॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत १६ संघानी सहभाग घेतला होता. लिटिल फ्लॉवर इंग्लिश हायस्कूल मधून १९ वर्षाखालील मुला मुलींचा संघ दाखल झाला होता.

हायस्कूलच्या संचालिका जेनेट डीसूझा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विविध खेळात स्पर्धेत सहभाग घेऊन यश मिळवतात. संघाचे प्रशिक्षक अरुणकुमार गुप्ता यानी विद्यार्थांना प्रशिक्षण दिले असून यंदाच्या जिल्हा स्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत लिटिल फ्लॉवर इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय पारितोषिक पटकावले बद्दल संचालकांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## शिरपूर तालुक्यात लाडकी बहीण सोडून बाकी योजनांचे अनुदान रखडले - प्रफुल्ल पाटील



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.४, शिरपूर :** शिरपूर तालुक्यात व त-हाडी परिसरात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दर महिन्याला पंधराशे रुपये खात्यावर जमा होऊ लागले असले तरी गेल्या अनेक महिन्यापासून शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर मिळणारे अनुदान, पी एम किसान योजना, पीक पेरा योजना, घरकुल योजना, गाय गोठे आदी पीकविमा याचे पैसे खात्यावर जमा न झाल्याने लाभार्थी व शेतकरी वर्गातून संताप व्यक्त केला जात असल्याची माहिती त-हाडी ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल पाटील सांगितले आहे. शिरपुर तालुक्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत बहुतांश महिलांच्या खात्यावर पैसे जमा होऊ लागल्याने आनंद व्यक्त केला जात आहे.

महिलांना अनुदान मिळावे,

ही चांगली गोष्ट आहे. त्यातव महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने महिलांसाठी ५० टक्के सवलतीने तिकीट देण्याची योजना सुरू केली आहे. याची नोकरदार महिलांमधून स्वागत होत आहे. मात्र, दुसरीकडे संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत निराधार विधवा, परितक्त्या महिलांना दर महिन्यास मिळणारे अनुदान मात्र मागील दोन महिन्यांपासून मिळालेले नाही. महिला लाडकी बहीण योजनेअंतर्गत अनुदान घेत असताल तर संजय गांधी निराधार योजनेचे पैसे मिळणार नाही, अशी चर्चा असल्याने निराधार,विधवा, परितक्त्या महिलावर्गातून चिंता

व्यक्त केली जात आहे. नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये अनुदान मिळत होते. त्यातील पात्र काही शेतकऱ्यांना अनुदान मिळाले आहे. परंतु बहुतांश शेतकरी सध्या अनुदानापासून वंचित आहेत. आचारसंहिता लागण्यापूर्वी शिरपूर तालुक्यातील घरकुल योजने व गाय गोठे पूर्ण झालेले आहेत ते मिळावे अशी मागणी त-हाडी येथील ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल पाटील ता शिरपूर यांनी केली आहे आहे.

## अहिल्यादेवी होळकर स्मारक लोकार्पण सोहळा संपन्न



**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.४, नांदगाव (नाशिक) :** नांदगाव शहरात राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक उभारावे.. नांदगाव तालुक्यातील धनगर समाज बांधवांची ही मागणी काही वर्षांपासून प्रलंबित होती. धनगर समाज बांधवांच्या मागणीची दखल घेत,नांदगाव तालुक्याचे लोकप्रिय, कार्यसम्राट आमदार सुहास (अण्णा) कांदे यांच्या प्रयत्नातून, नांदगाव शहरातील शनी मंदिर येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर उद्यान निर्माण करून त्या ठिकाणी अहिल्याबाई होळकर स्मारकाचे निर्माण कार्य पूर्ण करण्यात आले. हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत ४ऑक्टोंबर २०२४ रोजी सायंकाळी ८:२० वा., पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर स्मारकाचा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्यावर आधारित व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. येळकोट येळकोट जय मल्हार..व राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवीचा जयघोष.. फटाक्यांची आतषबाजी, भंडाऱ्याच्या उधळणीने नांदगाव शहराला यावेळी यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

## आंतरशालेय लोकनृत्य स्पर्धेत समता विद्या मंदिर शाळेला तिसरे पारितोषिक



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.५, मुंबई :** एल वार्ड सहशालेय उपक्रम २०२४-२०२५ इंग्रजी मराठी माध्यमिक विभाग आयोजित आंतरशालेय लोकनृत्य स्पर्धेत साकीनाका येथील समता विद्या मंदिर शाळेला तिसरे पारितोषिक मिळवण्यात यश आले.

आंतर शालेय स्पर्धेत एल विभागातील विविध शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. शिक्षण निरीक्षक उत्तर विभाग मुंबई उपनगरच्या वतीने या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. समता विद्या मंदिर शाळेचे सचिव राजेश सुभेदार आणि संचालिका ज्योती सुभेदार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विविध स्पर्धेत पारितोषिक पटकावित आहेत. समता विद्या मंदिर शाळेतून आंतरशालेय लोकनृत्य स्पर्धेत लक्ष्मी बोरा, प्राजक्ता पटेल, संस्कृती बारे, कुसुम जयस्वाल, अक्षदा कांबळे, रश्मी सुखदरे, कमलेश दळवी, राधेश्याम सूर्यवंशी, आलेख शिंदे, मानव झटपटे, सुजित दिवटे, आवेश सय्यद आदी विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

# आ.पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रयत्नांना यश, मराठी भाषेला अभिजात दर्जा म्हणून केंद्राची मंजुरी

**अक्षराज : प्रमोद दिवाणजी**

**दि.०४, सातारा (कराड) :** मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत केंद्र सरकारने मंत्री मंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली असल्याने हा क्षण मराठी भाषिकांसाठी अभिमानाचा क्षण ठरलेला आहे. यानिमित्त माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री असताना २०१२ साली मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याबाबत समिती गठीत केली होती ज्याचा अहवाल ११ जुलै २०१४ रोजी केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला होता. आज अखेर त्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली असून मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. यामुळे याचा पाठपुरावा करणारे पृथ्वीराज चव्हाण यांच्या कार्यकर्त्यांनी कराड शहरात दत्त चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक याठिकाणी एकत्र येऊन फटाक्यांची आतिषबाजी करून लाडू वाटप केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष शिवराज मोरे, कराड दक्षिण काँग्रेस अध्यक्ष मनोहर शिंदे, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष धनाजी काटकर, इंद्रजित चव्हाण, माजी नगराध्यक्षा नीलम येडगे, जिल्हा महिला काँग्रेस उपाध्यक्षा गीतांजली थोरात, कराड दक्षिण युवक काँग्रेसचे अध्यक्ष दिग्विजय



पाटील, शहर काँग्रेसचे अध्यक्ष ऋतुराज मोरे, माजी नगरसेवक अशोकराव पाटील, प्रदीप जाधव, सुनील बरिदे, गणेश गायकवाड, दत्तात्रय सूर्यवंशी, युवक काँगेसचे अनिल माळी, मुकुंद पाटील, विक्रम पाटील, जितेंद्र यादव, अबरार मुजावर, देवदास माने आदीसह काँग्रेस कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष शिवराज मोरे म्हणाले कि, माननीय पृथ्वीराज चव्हाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी रंगनाथ पाठारे समिती गठीत केली होती. समितीने आपला अहवाल बनविला व राज्य सरकारने तो केंद्राकडे सादर केला. आज त्या अहवालावर शिक्कामोर्तब झाल्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला मिळाला आहे.

पृथ्वीराज चव्हाण तथा बाबांचे कार्य नेहमीच आदर्श राहीले आहे. त्यांनी प्राकृत भाषा संगणकावर आणण्यासाठी फार मोठे संशोधन केले. स्व. राजीव गांधी पंतप्रधान असताना त्यांनी मराठी भाषा संगणकावर आणली. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी मुख्यमंत्री असताना मराठी भाषा विकसित व्हावी, मराठीचा गौरव वाढावा यासाठी साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली. त्याच सातारच्या भूमितील माननीय पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर या भूमीचा गौरव आहे. आज मराठी भाषेला केंद्राने अभिजात दर्जा देऊन आपले सोपस्कार पार पाडले आहेत.

तसेच यावेळी बोलताना जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष धनाजी काटकर म्हणाले कि, केंद्रात १० वर्ष सत्तेवर असलेल्या भाजपा सरकारने याचे श्रेय घेण्याचे कारण नाही. राज्यात व केंद्रात सत्ता असताना त्यांना मराठी भाषेचे प्रेम कधी दाटून आले नाही. आज केवळ सत्ता जाणार या धास्तीने त्यांना मराठी भाषा आठवली व मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे पुण्य केले. त्यामुळे मराठी भाषेला जो अभिजात दर्जा मिळाला आहे याचे पूर्ण श्रेय माननीय पृथ्वीराज चव्हाण यांनाच मिळते व याचा आम्हा सर्वाना अभिमान आहे.

आजच्या दिनी मा. पृथ्वीराज चव्हाण यांचे अभिनंदन करावे वाटते.

# ओबीसी सुशिक्षित बेकार: उलथून टाकेल सरकार




ओबीसी समाजाला मिळालेले आरक्षण हे सद्या धोक्यात आले असून ते पुढे रद्दी होऊ शकते. त्यामुळे काँग्रेसच्या वतीने ओबीसी समाजामध्ये जनजागृती करण्यात येत आहे. सरकार विरोधात आंदोलने करण्यात येत आहेत. महाराष्ट्रभरातील विविध ओबीसी संघटनाही सरकारच्या विरोधात पेटून उठू लागल्या आहेत. जिकडे तिकडे निषेध मोर्चे, संप, चक्काजाम, उपोषणे, आंदोलने होऊ लागले आहेत. अजब सरकारच्या गजब निर्णय- कारनाम्यांना जनता आता ठेचून काढून त्यांना- सरकारच्या कच्च्या बच्च्यांना त्यांची जागा आणि लायकी दाखवून देणार आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्टच! तसेच ओबीसींची जातनिहाय जनगणना करणे गरजेचे आहे, अशी मागणी यातून करण्यात येत आहे, ती अगदी रास्तच आहे. प्रत्येक जिल्ह्यात ओबीसींसाठी स्वतंत्र वस्तीगृह निर्माण करावे व ते चालविण्यासाठी ओबीसीमधील सुशिक्षित बेकार लोकांना चालू करण्यास परवानगी द्यावी. महाज्योती ही ओबीसींसाठी चालू केलेली वित्तिय संस्था आहे. परंतु त्यासाठी पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर या ठिकाणी त्वरीत विभागीय कार्यालय चालू करण्यात यावे. परदेशी शिक्षणासाठी व इतर महत्त्वाच्या शैक्षणिक डिग्रीसाठी भरीव निधीची तरतूद करावी, याही मागण्या लावून धरण्यात येत आहेत.

बहुजनांसाठी व बलुतेदारांसाठी विविध महामंडळे स्थापन केले आहे. परंतु त्यांना पुरेसा निधी व पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे योजनांची अंमलबजावणी होत नाही. तसेच बलुतेदार महामंडळासाठी अडीच हजार कोटी रूपयाची तरतूद करून पुर्वी जे कर्ज काढले आहेत, ते सर्व पुर्णपणे माफ करून कोर्टातील केसेस काढुन घ्याव्यात. मागसवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना आहे. त्यापध्दतीची ओबीसींसाठी स्वाधार योजना त्वरीत चालू करण्याचीही मागणी होत आहे. छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण राज्यात आगामी काळात सत्यपाल मलिक यांच्या विविध शहरांमध्ये सभा घेतल्या जाणार आहेत यामध्ये छत्रपती संभाजी नगर पुणे शहरात घेतल्या जाणार असल्याची माहिती काँग्रेसच्या ओबीसी सेलचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे. घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत त्यांनी ओबीसींवर होणाऱ्या अन्यायाचा पाढाच वाचून दाखवला आहे, हे अभिनंदनीयच! त्यावेळी माळी म्हणाले होते, की सत्यपाल मलिक यांच्यासोबत माझे बोलणे झाले असून पुढच्या महिन्यात त्यांच्या सभा राज्यात घेण्यात येणार आहेत. त्यामध्ये छत्रपती संभाजी नगर, नाशिक, नागपूर, पुणे या ठिकाणी या सभा होणार आहेत यामधून मलिक हे केंद्र सरकारची पोलखोल करणार असल्याचे माळी यांनी म्हटले आहे. या अशा रोषांना सरकारला सामोरे जावे लागत आहे, रोष पत्करावा लागत आहे, तेव्हा सरकारने आपली थोडी थोडकी लाज वाचवून ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय तातडीने घ्यावा.

देशातील ९० टक्के ओबीसी आणि मागासवर्गीय लोकसंख्येला खरोखरच न्याय द्यायचा असेल, तर देशातील ओबीसींसह सर्व जातींची जनगणना होणे गरजेचे आहे. या देशात धर्म आणि जातीच्या नावावर लोकांना भडकवले जात आहे. धर्माच्या नावावर दंगली घडवून आणल्या जात आहेत, शाळांकडे जाणारा जमाव धार्मिक उन्मादाकडे वळवला जात आहे. धर्माच्या नावाखाली काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांमध्ये तरुणांना सहभागी करून, त्यांच्या हातातून पेन-वही काढून, त्यांना त्रिशूळ, तलवारी देऊन त्यांच्या भविष्याशी खेळ केला जात आहे. या देशाला शाळांची गरज आहे, मंदिरांची नाही. मंदिरापासून फक्त ब्राह्मणी पुजार्यांना रोजगार मिळेल, परंतु बहुजन लोकांना त्यापासून काही एक लाभ नशीब होऊ शकत नाही. शाळेत शिकून देशसेवा म्हणून सरकारी नोकरीत तरी रूजू होईल. नोकरी लागल्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल. ओबीसींची परिस्थिती सुधारू नये म्हणून की काय? शैक्षणिक आणि नोकर्यातील आरक्षण संपवण्यात आले आहे. म्हणजे ब्राम्हण किती षडयंत्रकारी असतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे. म्हणून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगत असत, ब्राम्हीन्स हॅव अ ब्रेन वुईथ इन द ब्रेन..! ब्राम्हणांच्या एका मेंदूत अनेक षडयंत्रकारी मेंदू लपलेले असतात. म्हणून तो सतत षडयंत्र रचत असतो. आजचे ब्राह्मणीमेंदूयुक्त सरकारही देश विकायला- देश बरबाद करायला निघाले आहे, वेगळे सांगावे लागू नयेच!

ओबीसींनी नाना देवांधमच्या नादी लागून स्वत:चे वाटोळे केले आहे. कारण धर्म ही अफूची गोळी आहे. या धर्म नावाच्या अफूच्या गोळीची नशा चढली तर ती धोकादायक- विनाशक ठरते. म्हणून ओबीसींनी सावध होणे गरजेचे आहे. ज्या दिवशी ओबीसींची जातनिहाय जनगणना होईल, त्या दिवशी ओबीसी ब्राम्हणी गुलामीतून नक्कीच होईल. हे मी येथे जगजाहीरपणे लिहून देत आहे. कारण त्याला एससी, एसटीप्रमाणे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासन-प्रशासनात भागीदारी मिळू शकते आणि ओबीसींच्या जागांवर ब्राम्हणांनी जो कब्जा केला आहे; तो त्यांना सोडावा लागू शकतो. हीच भीती ब्राह्मणीमेंदूच्या शासकवर्गाला असल्याने तो ओबीसींची जातनिहाय जनगणना करू पहात नाही, तो प्राणप्रणाने विरोध करत असतो. एवढेच नाही तर ओबीसींच्या ऑक्सिजनवरच ब्राम्हणवाद जीवंत आहे. ज्यादिवशी ओबीसी ऑक्सिजन काढेल त्यादिवशी ब्राम्हणवादाचे त्याचबरोबर शासकवर्गाचेही रामनाम सत्य झाल्याशिवाय राहणार नाही, एवढे निश्चित आहे!

बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ओबीसी समाजाची वेगळी जनगणना करावी, अशी मागणी ओबीसी, एससी, एसटी सोशल फ्रंटच्या वतीने विभागीय आयुक्तांमार्फत पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याचे कारण काय असावे बरे? महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात ओबीसी समाज आहे, जनगणनेत भरण्यात येणाऱ्या अर्जामध्ये अनेक रकाने असतात. यामध्ये एक रकाना वाढवून ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हायलाच हवी. इतर मागास वर्गासाठी योजना आखायच्या असतील, विविध कार्यक्रम राबवायचे असतील तर त्या संदर्भात ओबीसी जनगणना होणे अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या चार मार्च २०२१च्या निर्णयानुसार महाराष्ट्रातील ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आले आहे. परिणामी ओबीसी, एससी, एसटी समाजामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. यासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाने मागविलेली वस्तुनिष्ठ माहिती- इम्पिरिकल डाटा तयार करण्यास व ओबीसींची निश्चित आकडेवारी काढण्यासाठी जातनिहाय जनगणने केल्यास अधिकच सोयीचे होईल, असा दावाही त्यांनी करत महाराष्ट्र राज्याने बिहारच्या धर्तीवर राज्यातील ओबीसींची स्वतंत्र जनगणना करावी, केंद्र सरकारने ओबीसींची घरोघरी जाऊन शिरगणती करावी अशी मागणी केली. यासह सार्वजनिक उपक्रमांचे खासगीकरण व विक्री करण्यात येऊ नये, पदोन्नतीतील आरक्षण लागू करण्यात यावे, ओबीसींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा देण्यात याव्यात. रिक्त जागांचा अनुषेश तत्काळ भरण्यात यावा, महाराष्ट्रात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय होऊ नयेत, येणाऱ्या निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, अशीही मागणी ओबीसी, एससी, एसटी सोशल फ्रंटच्या वतीने करण्यात आली आहे. याच मागणीसाठी पुढे पुढे तर आणखीच मोठ्या संख्येत सरकारी कचेऱ्यांवर हल्लाबोल होईल, सरकारने आपली लाज मूठीत घट्ट आवळून सज्ज असावे. सरकारने गडचिरोलीसारख्या मागास जिल्ह्यांच्या विकासाच्या उद्देशाने पेसा कायदा अमलात आणला. शासनाच्या मते त्या भागात फक्त आणि फक्त आदिवासी समाजच वास्तव्यास आहे. तेथे इतर मागासवर्ग नाही. अशी बिनडोक समज शासनाच्या धुरीनांची होत असावी, असे वाटते. त्याअंतर्गत विविध विकासयोजना राबवताना अथवा नोकरभरती करताना केवळ एसटी प्रवर्गातीलच उमेदवार घेतले जातात. लायक उमेदवार प्राप्त न झाल्यास ते पद दीर्घ कालावधीसाठी तसेच रिक्त ठेवले जाते. मागास भागात अशीच अनेक पदे रिक्त राहिल्याने त्याचा विकास होणे शक्य आहे काहो? प्रथम प्राधान्य आदिवासी वर्गास बहाल करून नंतर रिक्त पदांवर तेथीलच स्थानिक इतर प्रवर्गातील उमेदवारांना संधी देण्यात आल्यास यथायोग्य विकास साधने शक्य होईल, असे माझे प्रांजळ मत आहे. येथील आदिवासी बांधवांचे याबाबत मत जाणून घेतले असता, तेही त्यांच्या पश्चात इतर मागास वर्गातील उमेदवारांची वर्णी लावून विकास साधला जावा, याच मताचे समर्थन करताना दिसतील. कारण एक मागास वर्ग हा दुसर्या मागास वर्गावर अवलंबून आहे, एकमेकांना सहायक आहे, हेच यावरून सिद्ध होते. म्हणूनच सरकारने तात्काळ ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्यासंदर्भात निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. ओबीसींची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे, झालीच पाहिजे!

**श्री.कृष्णकुमार निकोडे**
**गडचिरोली,९४२३७१४८८३.**

# मोहटादेवी यात्रोत्सवास मोठ्या उत्साहात प्रारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अ.नगर) :** खा.नीलेश लंके व राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून गेल्या ८ वर्षापूर्वी सुरू करण्यात आलेल्या नवरात्र यात्रोत्सवास शुक्रवार, दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४ रोजी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.

खा.लंके व राणीताई लंके तसेच नीलेश लंके प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी महिलांना शुभेच्छा दिल्यानंतर हंगे शिवारातून शेकडो बसेस मोहटादेवी कडे रवाना झाल्या. दिनांक ०४ ऑक्टोबर रोजी सकाळी हंगे शिवारात एम.आय.डी.सी लगतच्या मैदानावर सुपा गटातील विविध गावांच्या बसेस एकत्रीत झाल्या. प्रत्येक बसेसमध्ये पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या तसेच फराळाची व्यवस्था करण्यात आल्यानंतर या बसेस मोहटादेवी कडे रवाना झाल्या.

दुसऱ्या माळेच औचित्य साधून यात्रेत सहभागी झालेल्या महिलांना हिरव्या रंगाच्या साडया परिधान केल्या होत्या. यात्रेत सहभागी झालेल्या बसेसमध्ये अग्रभागी असलेल्या बसची फुलांनी सजावट करण्यात आली होती. खा.लंके व राणीताई लंके यांनी या बसेसला हिरवा झेंडा दाखविल्यानंतर बसेसचे प्रस्थान झाले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट तसेच निलेश लंके प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी हितचिंतक व महिला भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. तिसगाव येथे फराळाची व्यवस्था मोहटादेवी यात्रोत्सवामध्ये सहभागी झालेल्या महिलांसाठी प्रवासादरम्यान तिसगाव येथे फराळाची व्यवस्था करण्यात आली असून खा. निलेश लंके यांचे बंधू दिपक लंके हे तेथील व्यवस्थेवर लक्ष ठेवून आहेत.

तसेच यात्रे दरम्यान महिलांना आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्यास यात्रेसोबत डॉक्टरांची टीम असलेली रुग्णवाहिका तैनात असून त्रास होणाऱ्या महिलेवर तात्काळ उपचार करण्याची सोय करण्यात आली आहे.

**लंके खासदार झाले, मात्र उपक्रम विसरले नाहीत**

संपूर्ण महाराष्ट्राला हेवा वाटेल असा हा उपक्रम आहे. आमदार म्हणून काम करताना केलेल्या कामाची पावती म्हणून जनतेने नीलेश लंके यांना लोकसभा निवडणूकीत विजयी केले. आठ वर्षांपूर्वी सुरू केलेला हा उपक्रम लंके हे लोकसभेत गेल्यानंतरही विसरले नाहीत.

**सुदाम पवार, माजी सभापती**

**राणीताई आमदार म्हणून विधानसभेत पाठवायचंय**

५ वर्षांपूर्वी निलेश लंके हे तुम्हा सर्वांच्या आशिर्वादाने आमदार झाले. या पाच वर्षात मतदारसंघाचा कायापालट करण्याचे काम त्यांनी केले. लंके यांच्या संकल्पनेतून मतदारसंघात वर्षभर काही ना काही उपक्रम राबविले जातात. आता निलेश लंके हे लोकसभेत गेले त्यामागे जनतेचे आशिर्वाद आहेत. तसेच आशिर्वाद शारदीय नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने राणीताई यांना देऊन त्यांना आमदार म्हणून विधानसभेत पाठवायचे आहे.

**बाबाजी तरटे, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेर**

# थोडक्यात

## पालकांनी मुलांवर सीसीटीव्ही बनून लक्ष ठेवा - सुदेश तांबे

**अक्षराज : विवेक परब**



**दि.०५, सिंधुदुर्ग :** बदलत्या परिस्थितीनुसार मुलांसमोर अनेक संकटे, आव्हाने सामोरी येत आहेत. यासाठी पालकांनी सजग होवून मुलांच्या दैनंदिन कार्यावर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही बनून काम करा असे आवाहन आचरा पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार सुदेश तांबे यांनी आचरा हायस्कूल येथे केले. शाळेच्या मुलांवर वाढत्या अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर पालकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल आचरा येथे पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुलांबाबत पालकांनी कोणती सावधगिरी बाळगावी याबाबत तांबे मार्गदर्शन करत होते.

यावेळी त्यांच्या सोबत स्थानिक स्कूल समिती अध्यक्षा निलिमा सावंत, सदस्य राजन पांगे, बाबाजी भिसळे, पत्रकार अर्जुन उर्फ दादा बापर्डेकर, संजय पाटील, मुख्याध्यापक गोपाळ परब, उपमुख्याध्यापक घुटूकडे, मधुरा माणगांवकर, दत्तात्रय जाधव आदींसह बहुसंख्येने पालक उपस्थित होते. यावेळी बोलताना तांबे यांनी मोबाईलमुळे गुन्ह्यात वाढ होत आहे. वाईट गोष्टीसाठी मोबाईलचा वापर होत आहे. यासाठी पालकांनी मुलांच्या मोबाईल वापरावर बंधने आणणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक परब यांनी केले तर आभार दत्तात्रय जाधव यांनी मानले.

# बदलापूरच्या घटनेनंतर मनसेची पाऊले

## सर्व शाळांना दिले पत्र, सुरक्षा सुनिश्चित करण्याचा आग्रह

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०५, कल्याण (ठाणे) :** बदलापूरमध्ये घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) तातडीने पाऊले उचलली आहेत. अशा घटना पुन्हा घडू नयेत. म्हणून मनसे जिल्हा अध्यक्ष उल्हास दादा भोईर, शहर अध्यक्ष प्रकाश भोईर, उप शहर अध्यक्ष संजय राठोड, शाखाध्यक्ष युवराज कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार, दिनांक ०५ ऑक्टोबर २०२४ रोजी कल्याण पूर्व या विभागातील शाळेत पत्र देण्यात आले. तसेच यावेळी उपशाखा अध्यक्ष विश्वास गायकवाड व उपशाखा अध्यक्ष अमोल ईलकर उपस्थित होते.

या पत्रामध्ये शाळांची सुरक्षा, विद्यार्थी संरक्षण आणि अन्य सुरक्षात्मक उपायांची कडक अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मनसेच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, या पत्रात पुढील मुद्द्यांवर या पावलामुळे राज्यभरातील पालक आणि शाळांमध्ये सुरक्षा व्यवस्था कडक करण्याच्या हालचालींना गती मिळन्यायासाठी व बदलापूर सारख्या घटना टाळण्यासाठी मदत होईल.

**पत्रात मांडण्यात आलेले मुद्दे पुढील प्रमाणे** - १)आपल्या शाळेत काम करणाऱ्या तसेच नव्याने रूजू होणाऱ्या सर्व शिक्षक. कर्मचारी. बस चालक. शिपाई या सर्वांची चरित्र पाडताळणी करावी २). प्रत्येक कर्मचारी यांची पोलीस पडताळणी करणे बंधनकारक असावी. ३). कर्मचारी वर्गाची मानसिक संतुलन तपासणी वेळोवेळी करण्यात यावी. ४). शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकी बाबत पालक विद्यार्थी संवाद वेळोवेळी साधावा. त्यातून मिळणाऱ्या माध्यमातून मधून भविष्यातील अनुचित प्रकार टाळता येथील. ५). काही शाळा घडलेला प्रकार व घडत असलेली प्रकरणे शुल्लक समजतात.

केवळ समज व मिटवा मिटवी करतात. हे प्रकार गांभीर्याने घेऊन आम्ही केलेल्या सूचना काळजीपूर्वक विचार करून त्यानुसार अंमलबजावणी करावी ही विनंती.



## शालेय विद्यार्थांना बाल सुरक्षा जनजागृती कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०४, कुर्ला (मुं.उपनगर) :** सध्या महाराष्ट्रामध्ये विविध राज्यांमध्ये मुलांवर होणाऱ्या अत्याचारचे प्रमाण अधिक होत असल्याने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाच्या माध्यमातून सर्व पोलीस यांना स्थानिक संस्थेच्या वतीने प्रशिक्षण वर्ग घेण्याच्या सूचना देण्यात आले आहेत. शुक्रवार, दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४ रोजी शिवसृष्टी मराठी मनपा शाळा कुर्ला पूर्व या ठिकाणी नेहरू नगर कुर्ला पोलीस ठाणे यांचा माध्यमातून पाचवी ते आठवी मधील शालेय विद्यार्थ्यांना बाल सुरक्षा या विषयावर जनजागृती व्हावी. या हेतूने संकल्प संस्था वतीने शालेय विद्यार्थ्यांना संभव धोका काय आहे. अशा वेळेस मुलांनी कोणत्या प्रकारे काळजी घेतली पाहिजे. या विषयावर संकल्प संस्थांचे विनोद हिवाळे यांनी मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणाचे आयोजक नेहरू नगर कुर्ला पोलीस ठाण्याचे निर्भया पथक ५ चे निर्भया अधिकारी पल्लवी पाटील (पी.एस.आय) यांचे सहकारी केदार (पो.शि), पोळ (म.पो.शि), कडरे (म. पो. शि), वसतकार (म.पो.शि) यांनी केले. विशेष सहकार्य शिवसृष्टी मराठी मनपा शाळा कुर्ला पूर्व चे मुख्याध्यापिका निशा म्हात्रे आणि वर्ग शिक्षिका अनिता डोईफोडे यांचे लाभले.

## अतिक्रमण विभागामार्फत कोपरखैरणे विभागात तोडक कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ.राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत १) साने पीजी, एस.एस टाईप, रूम नं.३१५, सेक्टर-१८, कोपर खैरणे, नवी मुंबई, यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती.

सदर बांधकाम धारकांकडून रु.१०,०००/- दंड वसूल करण्यात आला. तसेच २) केटी रिएलिटी, भूखंड क्र- २७, साई कुटीर, सेक्टर-९, कोपरखैरणे, येथील बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर दुसऱ्यांदा कारवाई करून बांधकाम निष्कासन केले. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेक्टर- ९ए येथील महानगरपालिकेच्या भूखंडावरील एकूण २० अनधिकृत झोपड्या हटविण्यात आल्या. सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहा. आयुक्त सुनिल काठोळे, कनिष्ठ अभियंता सचिन नामवाड व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी नमुंमपा पोलीस बंदोबस्त होता. तसेच १० मजूर, ०२ इलेक्ट्रॉनिक हॅमर, गॅस कटर ०१, जे सी बी ०१, पिकअप व्हॅन ०१ कारवाई करीता वापर करण्यात आले.

# 'युनेस्को' कडून प्रतापगडाची पाहणी

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.०४, सातारा :** सातारा दौऱ्यावर आलेल्या युनेस्कोच्या पथकाकडून शुक्रवार, दिनांक ०४ ऑक्टोबर रोजी सकाळी किल्ले प्रतापगडाला भेट देण्यात आली. या भेटीवेळी पथकाने किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तूंची पाहणी करून त्यांची माहिती जाणून घेतली. किल्ल्याची तटबंदी व अन्य वास्तू दीर्घ काळापासून सुस्थितीत असल्याचे पाहून पथकाने किल्ल्यांची जपणूक करणाऱ्या सेवेकऱ्यांचे कौतुक ही केले. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील ११ व तामिळनाडूमधील जिंजी किल्ल्याचा जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश करावा, असा प्रस्ताव युनेस्कोला पाठवला आहे.

या यादीत सातारा जिल्ह्यातील प्रतापगड किल्ल्याचा समावेश आहे. गेल्या साडेतीन वर्षापासून हा किल्ला दिमाखात उभा आहे. या किल्ल्याची युनेस्कोच्या पथकाकडून पाहणी करण्यात आली. पुणे जिल्ह्याचा दौरा आटोपून हे पथक शुक्रवार, दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता प्रतापगडावर दाखल झाले.

पथकाकडून किल्ल्यावरील स्वच्छता व्यवस्थापन, मुख्य दरवाजा, चोर वाटा, तटबंदी, बुरुज तसेच सुशोभीकरणाची कामे आदींची पाहणी करून त्यांचे माहिती जाणून घेण्यात आली. यानंतर या पथकाने किल्ल्यावरील सेवेकार्यांशी संवाद साधताना उपस्थित तरुणांना काही प्रश्न ही विचारले. येथील तरुणांना उत्पन्नाचे कोणतेही शाश्वत साधन नाही की कसण्यासाठी शेती.प्रतापगडाला भेट देणाऱ्या पर्यटकांवरच त्यांची रोजी-रोटी चालते.

या किल्ल्याचा जागतिक वारसा स्थळात समावेश झाल्यास छत्रपती शिवरायांच्या इतिहासाची जगाला नव्याने ओळख होईल. किल्ल्यावर पर्यटन वाढेल, रोजगाराच्या संधी वाढतील. त्यामुळे किल्ल्याचा जागतिक वारसास्थळ यादीत समावेश करावा, अशी मागणी तरुणांनी युनेस्कोकडे केली. या पथकाकडून अफजल खान कबर व परिसराची पाहणी देखील करण्यात आली. यानंतर हे पथक साताऱ्याकडे रवाना झाले.पथकाने छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयाला भेट देऊन येथील १२ किल्ल्यांच्या प्रतिकृती ची पाहणी केली. वाघनखांच्या दालनालाही या पथकाने भेट देऊन येथील कामकाज व व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी यांनी किल्याचे प्रशासकीय कामकाज,तसेच जिल्हा नियोजन समिती, जिल्हा वन अधिकारी आणि पुरातत्त्वविभाग यांच्या पुरातत्व शास्त्रीय दृष्ट्या कामकाज पहिले जाते असे विश्लेषण युनेस्को पथकला माहिती दिली.

## कै.नागोराव दुधंबे यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुकबधीर विद्यार्थ्यांना भोजनदान

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०५, मुदखेड (नांदेड) :** राष्ट्रीय चर्मकार महासंघ युवा तालुका अध्यक्ष सुभाष दुधंबे सामाजिक कार्यकर्ते, विकी दुधंबे, यांचे वडील कै.नागोराव शावण दुधंबे यांच्या सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त नुकतेच अंकुर शिक्षण संस्था संचलित निवासी मुकबधिर विद्यालय वसतिगृह कृष्णा नगर येथील मुकबधीर विद्यार्थ्यांना भोजनदान, फळे व शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक हणमंत गवलवाड, सुनिता सुर्यवंशी, गणेश बामणे, भास्कर वाघ, सतिष हजारे, कैलास जामुंदे, वाडेकर माऊशी स्वयंपाकीण, दता हासेवाड, गजानन शिंदे सेवक, बालाजी राठोड, सुभाष दुधंबे, विकी दुधंबे, उद्धव राठोड, वैभव हाटकर, वरद हाटकर, विकास उन्हाळे, अनिल चुडेवार, नितीश चुडेवार, जामुदे सर,दत्ता हासेवाड, गजानन शिंदे, कालीदास रेगुलवाड, लोकडेश्वर गायकवाड, बादल राठोड, हरिश कांबळे, अकाश कमळे, रितेश राठोड, राहुल मात्रे, रंजित पाटिल, सागर पाटिल, संतोष वाघमारे, आर्यन गिरी, अकाश गायकवाड, श्रीनिवास सारले, मयुर पेकमवार, यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होते.

# गाजियाबादचे पडसाद थेट अमरावतीत जमाव पोलीस ठाण्यात धडकला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, अमरावती :** उत्तर प्रदेशातील गाजियाबाद येथील दासनादेवी मंदिराचे विश्वस्त यती नरसिंह आनंद सरस्वती यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी जमावाने शुक्रवारी रात्री उशिरा नागपुरी गेट पोलीस ठाण्यात धडक दिली. यावेळी संतप्त जमावाने परिसरात दगडफेक केली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराचा वापर करावा लागला. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मंदिराच्या विश्वस्ताने आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप असून, त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात निवेदन देण्यासाठी आलेल्या विशिष्ट समुदायाच्या जमावाने केली होती. पोलिसांसोबत चर्चा करीत असतानाच जमावातील काही लोकांनी संतप्त झाले व त्यानी पोलीस ठाण्याच्या बाहेर येऊन दगडफेक सुरू केली, त्यामुळे काही वेळातच नागपुरी गेट परिसरात तणावाची स्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.



मात्र, जमाव ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. त्यामुळे पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. जमावाने पोलिसांच्या वाहनांवर दगडफेक करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अतिरिक्त पोलीस कुमक मागविण्यात आली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याची माहिती मिळताच पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील यांच्यासह इतर पोलीस अधिकारी आणि अतिरिक्त कुमक घटनास्थळी पोहचली. त्यानंतर शांतता प्रस्थापित झाली.

नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. कुणीही जमावाने एकत्र येऊ नये, कुठल्याही प्रकारचे शस्त्र, लाठी-काठी जवळ बाळगू नये. कायदा व सुव्यवस्था हाती घेण्याचा कोणीही प्रयत्न करु नये तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये आणि पसरवू नये. पालकांनी आपल्या मुलांना विनाकारण घराबाहेर पाठवू नये व ते कोणत्याही प्रकारच्या असामाजिक तत्वांबरोबर सामाजिक सुव्यवस्था बिघडविण्यासाठी मदत करणार नाहीत याकडे लक्ष ठेवावे. पोलीस ठाणे परिसरात सध्या शांतता असून ती बिघडविण्याचा कोणीही प्रयत्न करु नये, अन्यथा योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अमरावती शहरातील इतर पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील नागरिकांनी दक्ष रहावे व कोणत्याही प्रकारच्या असामाजिक कृत्यात सहभागी होऊ नये, असे आवाहन पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी केले आहे.